|| ज्ञानं बलानां बलम् ||

NAAC RE-ACCREDITED B Grade

मराठी व इंग्रजी माध्यम

# माहितीपत्रक
## २०२३ -२४



सरस्वती मंदिर संस्थेचे

# सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस्, पुणे २

(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कायम संलग्नित )

Saraswati Mandir Sanstha's,

# Saraswati Mandir Night College of Commerce & Arts, Pune 2

( PU / PN / 092 / 1992 )

(Re-accredited by NAAC,Bangaluru, B Grade)

ई-मेल : smncca@rediffmail.com **website :** www.smnightcollege.org



*Saraswati Mandir Night College*
*of Commerce & Arts, Pune 2*

## Mission

An institute dedicated to spreading the light of education by night.

## Vision

Empowerment of working and disadvantaged students by imparting education by night and providing opportunities of career and personality development.

## Objectives

1) To Impart quality higher education to working and disadvantaged students.
2) To explore the best possible ways for student's progression.
3) To act as a catalyst for empowering students to become better human beings with their spirit of nationality.
4) To strengthen the students' abilities for the all round development of their personality.

**महाविद्यालयाच्या प्रवेशाचा अर्ज www.smnightcollege.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. Online प्रवेश अर्ज माहिती भरून त्याची प्रिंट प्रत काढून, पृष्ठ क्रमांक ४ वर नमूद केलेल्या प्रमाणपत्रासह तो अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावा. त्यानंतरच महाविद्यालयातील आपला प्रवेश निश्चित होईल.**

महाराष्ट्र शासनमान्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कायम संलग्न

सरस्वती मंदिर संस्थेचे

# सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड आर्टस्

॥ ज्ञानं बलानां बलम् ॥

(PU/PN/092/1992)

(Re-accredited by NAAC B Grade)

**१३५९, शुक्रवारपेठ, बाजीराव मार्ग, पुणे ४११ ००२**

**महाविद्यालयात खालील अभ्यासक्रम शिकविले जातात.**

## वाणिज्य विद्याशाखा

**बी. कॉम.**

स्पेशल विषय : बँकिंग अॅण्ड फायनान्स,

कॉस्ट अॅण्ड वर्क्स अकौन्टन्सी

**एम.कॉम.**

स्पेशल विषय – बँकिंग अॅण्ड फायनान्स

## कला विद्याशाखा

**बी. ए.**

स्पेशल विषय : मराठी, अर्थशास्त्र

**सर्वसाधारण विषय**

राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल, मानसशास्त्र

**एम. ए. – मराठी**

**एम. ए. – अर्थशास्त्र**

**परकीय भाषा**

प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम

जर्मन, फ्रेंच, जापनीज

२०२३–२४

## महाविद्यालयाविषयी थोडक्यात...

शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्रांतीचे पर्व सुरू करण्याचे श्रेष्ठत्व मिळालेल्या पुणे या शैक्षणिक नगरीमध्ये शिक्षणप्रसाराचे कार्य ही गौरवप्राप्त बाब समजली जाते. पुणे नगरी देशाची शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी आहे. या राजधानीत इ. स. १९२० यावर्षी बहुजन समाजाच्या शैक्षणिक उन्नतीच्या प्रेरणेतून श्री. चिं. ग. देशपांडे, य. रा. दाते, ग. ना. टिळक, म. के. भावे, स. वा. देशपांडे, अ. मा. पालकर, म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी सरस्वती मंदिर संस्था या नावाने शहराच्या मध्यवस्तीत बाजीराव रस्त्यावर ही संस्था स्थापन केली.

सन १९९२ – १९९३ मध्ये, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजासाठी शिक्षणाचा ध्यास असणाऱ्या; मात्र कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे, नोकरीमुळे शिक्षणापासून दूर राहिलेल्या समाजाचा विचार करून तसेच २१ व्या शतकातील काळाची गरज ओळखून पुणे विद्यापीठ संलग्न व महाराष्ट्र शासन मान्य सरस्वती मंदिर कला, वाणिज्य रात्र महाविद्यालय सुरू करून अनेकांना भावी जीवनात शिक्षणाच्या अभावी नोकरीत येणाऱ्या पदोन्नतीच्या अडथळ्यांचा मार्ग मोकळा करून दिला व संधीही प्राप्त करून दिली.

आज हे महाविद्यालय ''सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस्'' या नावाने विशाल रूप धारण करू लागले आहे.

नियमित प्राचार्य, पूर्णवेळ गुणवत्ताधारक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील असतात.

***MISSION***

***"An institute dedicated to spreading the light of education by night".***

## ■ महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

NAAC, द्वारे पुर्नमूल्यांकित महाविद्यालय 'B' Grade (2017-22)

१) शहराच्या मध्यभागात बाजीराव रस्त्यावर संस्थेच्या भव्य इमारतीत हे महाविद्यालय आहे.

२) दिवसा नोकरी किंवा इतर व्यवसाय करून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेण्याची नामी संधी (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कायम संलग्नित)

३) सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिका

४) सुसज्ज संगणक प्रयोगशाळा व वाणिज्य प्रयोगशाळा

५) विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी समजून घेणारे, शिस्तबद्ध अभ्यासक्रम शिकवण्याची जबाबदारी पाळणारे उच्च गुणवत्ताधारक तज्ज्ञ प्राध्यापक व कर्मचारी.

६) गुणवत्तावाढ व विकास शिबिरे

७) सांस्कृतिक व वाङ्मय मंडळाचे विविध उपक्रम.

८) व्यक्तिमत्त्व विकास वर्ग.

९) विद्यार्थ्यांचे हक्क, हित व विकास यावर वैयक्तिक लक्ष.

१०) जापनीज, फ्रेंच व जर्मन या परकीय भाषांचे वर्ग.

११) एम. ए. (मराठी), एम. ए. (अर्थशास्त्र) व एम. कॉम. व बी. ए. शिक्षण सुविधा.

१२) विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र कक्ष.

१३) उत्कृष्ट निकालाची परंपरा.

१४) महाविद्यालयाच्या कार्यालयाची वेळ दुपारी ३.०० ते रात्री १०.००.
वर्ग भरण्याची वेळ सायंकाळी ६.०० ते रात्री १०.००.

१५) माजी विद्यार्थी संघ

१६) स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ

१७) पुस्तक पेढी

१८) रोजगार कक्ष

१९) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व उपक्रमांत सहभाग.

२०) स्वतंत्र पार्किंग व्यवस्था

२१) केशवसुत करंडक राज्यस्तरीय स्वरचित काव्यवाचन स्पर्धा व काव्यकार्यशाळा
२२) विद्यार्थी विकास मंडळ, बहि:शाल योजना, आजीवन शिक्षण विभाग यांचे विविध उपक्रम
२३) विद्यार्थी मंच
२४) विद्यार्थिनी मंच

## ■ प्रवेश–पात्रता

**बी.ए. / बी. कॉम. साठी –**

बारावी आर्टस्, कॉमर्स, सायन्स व समकक्ष परीक्षा, डी. एड. इंग्रजी विषयांसह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस/विद्यार्थिनीस एफ. वाय. बी. ए. व एफ. वाय. बी. कॉम. मध्ये प्रवेश घेता येतो. विद्यार्थ्यांस/विद्यार्थिनीस प्रवेश अर्ज महाविद्यालयात ठरावीक नमुन्यात प्रत्येक वर्षी भरून द्यावा लागतो. प्रत्येक विषयाच्या तासांना वर्षभरात किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे. किमान उपस्थिती नसल्यास विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही. या महाविद्यालयात प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश अर्जासोबत विद्यापीठ पात्रता अर्ज (Eligibility Form) शुल्कासह भरून द्यावा लागतो. त्यावरून विद्यार्थ्यांची पात्रता विद्यापीठ ठरवते. विद्यापीठात पात्रता मान्य करेपर्यंत विद्यार्थ्यांचा प्रवेश तात्पुरता समजला जातो. प्रवेश अर्जासोबत विद्यार्थ्याने/विद्यार्थिनीने खालील प्रमाणपत्रे (प्रत्येकी २ झेरॉक्स प्रतींसह) सादर करणे आवश्यक आहे.

१) १२ वी/समकक्ष परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका
२) शाळा /कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला/ट्रान्सफर सर्टिफिकेट
३) मागासवर्गीयांसाठी जात प्रमाणपत्राची छाया प्रत.
४) स्थलांतर दाखला (मायग्रेशन सर्टिफिकेट – महाराष्ट्र बाहेरील विद्यार्थ्यांस)
५) गॅप सर्टिफिकेट (१२ वी नंतर शिक्षणात खंड पडला असल्यास)

**एम. ए. / एम. कॉम साठी –**

बी.ए. / बी. कॉम पदवी / समकक्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यास प्रवेश घेता येतो.

 प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्याने प्रवेश अर्जावर बारावीच्या मार्कलिस्ट प्रमाणेच नाव लिहावे.

विद्यार्थ्यांस/विद्यार्थिनीस प्रवेश अर्ज महाविद्यालयात ठरावीक नमुन्यात प्रत्येक वर्षी भरून द्यावा लागतो. प्रत्येक विषयाच्या तासांना वर्षभरात किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे. किमान उपस्थिती नसल्यास विद्यापीठ परीक्षेस बसता येणार नाही.

या महाविद्यालयात प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश अर्जासोबत विद्यापीठ पात्रता अर्ज (Eligibility Form) शुल्कासह भरून द्यावा लागतो. त्यावरून विद्यार्थ्यांची पात्रता विद्यापीठ ठरवते. विद्यापीठात पात्रता मान्य करेपर्यंत विद्यार्थ्यांचा प्रवेश तात्पुरता समजला जातो. प्रवेश अर्जासोबत विद्यार्थ्याने/विद्यार्थिनीने खालील प्रमाणपत्रे (प्रत्येकी २ झेरॉक्स प्रतींसह) सादर करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाच्या वार्षिक परीक्षेच्या वेळी एम. ए., एम. कॉम चे सर्व कामकाज महाविद्यालयाच्या तात्पुरत्या बदल झालेल्या वेळेतच घेतील.

१) पदवी / समकक्ष परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका २) ट्रान्सफर सर्टिफिकेट
३) स्थलांतर दाखला (मायग्रेशन सर्टिफिकेट महाराष्ट्र बाहेरील विद्यार्थ्यांस)
४) गॅप सर्टिफिकेट (१२ वी नंतर शिक्षणात खंड पडला असल्यास)

## ■ प्रवेशासंबंधी महत्त्वाच्या सूचना

**१) महाविद्यालयाच्या प्रवेशाचा अर्ज www.smnightcollege.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. Online प्रवेश अर्ज माहिती भरून त्याची प्रिंट/प्रत काढून, पृष्ठ क्रमांक ४ वर नमूद केलेल्या प्रमाणपत्रासह तो अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावा.**

२) शासकीय शिष्यवृत्ती व फी सवलती अर्ज.

३) प्रथम वर्ष कला, वाणिज्य, एम.ए. व एम. कॉम. भाग १ साठी विद्यापीठ पात्रता अर्ज भरणे आवश्यक आहे.

४) महाविद्यालयाचे प्रवेशशुल्क भरताना/परीक्षा फी भरताना विहीत नमुन्यातील बँकेच्या चलनाद्वारेच भरावे. रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही.

५) **शासकीय शिष्यवृत्ती व फी सवलतीचे अर्ज विद्यार्थ्याने वेळेत भरून दिले तरच ते विद्यार्थी सवलत घेण्यास पात्र ठरतील.**

६) प्रथम वर्ष वाणिज्य वर्गात कॉम्प्युटर कन्सेप्ट अॅण्ड प्रोग्रॅमिंग हा विषय घ्यावयाचा असेल तर अतिरिक्त शुल्क रु. ७०० आकारले जाईल.

७) महाविद्यालयातील प्रवेश अर्ज भरला याचा अर्थ संबंधित प्रवेश निश्चित झालाच असे नाही, याची नोंद घ्यावी.

८) महाविद्यालयातील प्रवेशाबाबत व शुल्कबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाचे अस्तित्वात असलेले/वेळोवेळी येणारे नियम बंधनकारक राहतील.

९) महाविद्यालयातील प्रवेश प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या नुसार दिले जातील.

१०) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासन नियमानुसार प्रत्येक तासाला ७५% पेक्षा कमी उपस्थिती असू नये. उपस्थिती कमी भरल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षेचा विद्यार्थ्यास फॉर्म भरता येणार नाही तसेच कोणत्याही प्रकारची शासकीय सवलत मिळणार नाही.

११) विद्यार्थ्याने आपले नाव बारावीच्या मार्कलिस्ट प्रमाणे किंवा नावात बदल असेल तर तशी संबंधित कागदपत्रे सादर करून त्या नावाप्रमाणे प्रवेश अर्ज भरावा.

१२) एकदा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर त्यापुढे पाच वर्षानंतर विद्यार्थ्याला परत नव्याने प्रवेश घ्यावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यानी पाच वर्षातच पदवी पूर्ण करावी. (बी.ए., बी.कॉम, एम. ए., एम. कॉम)

१३) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ओळखपत्र व रॅगिंग संदर्भातील फॉर्म भरणे आवश्यक आहे.

## ■ विद्यापीठ नियमांनुसार

१) प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय तपासणी व Physical Education Efficiency Test व **प्रत्येक सेमिस्टरला विद्यापीठ/महाविद्यालयाने निश्चित केलेले क्रेडीट कोर्स करणे अनिवार्य आहे.**

२) द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए./बी.कॉम या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींनी प्रवेश अर्जासोबत प्रथम वर्षाच्या गुणपत्रिकेच्या दोन झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे. **तसेच विद्यापीठाने निश्चित केलेले अतिरिक्त क्रेडिटचे कोर्स करणे अनिवार्य आहे.**

३) या महाविद्यालयात प्रवेश देण्याबाबतचा मा. प्राचार्यांचा निर्णय अखेरचा राहील.


नियमानुसार विद्यार्थ्याची उपस्थिती ७५% पेक्षा कमी असू नये.

४) महाविद्यालयाची कार्यालयीन वेळ (सुटीचे दिवस सोडून) सोमवार ते शनिवार : दुपारी ३ ते रात्री १० (आर्थिक देवघेवीची वेळ सोमवार ते शुक्रवार दुपारी ३ ते रात्री ९)

५) महाविद्यालयाच्या अध्यापनाची वेळ सायंकाळी ६.०० ते रात्री १०.

## ■ शासकीय शिष्यवृत्त्या व फी सवलती

सर्व प्रकारच्या शासकीय शिष्यवृत्ती व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व शिष्यवृत्ती योजना लागू आहेत.

## ■ महाविद्यालयातर्फे दिली जाणारी पारितोषिके

१) स्वानंद चॅरिटेबल ट्रस्ट पारितोषिक द्वितीय वर्ष वाणिज्य अकौन्टन्सीमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास.

२) तृतीय वर्ष वाणिज्य अकौन्टन्सीमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास.

३) कै. दत्तात्रेय महादेव श्रोत्री तर्फे सौ. नीलिमा सुनील श्रोत्री.
   १. कला शाखेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास
   २. सर्व विषयांत विद्यापीठ परीक्षेत सर्वोत्तम गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास.

४) कै. द. मु. आंबेकर स्मरणार्थ तर्फे श्री. दिलीप काळोखे
   १. कला विभागात प्रथम आलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस
   २. वाणिज्य विभागात प्रथम आलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस.

५) कै. सौ. सुलभा गिजरे पारितोषिक तर्फे एम. एच. गिजरे तृतीय वर्ष वाणिज्य अकौन्टन्सीमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास.

६) कै. जगन्नाथ भास्कर देशपांडे तर्फे सौ. सुमेधा देशपांडे
   १. कला विभागात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास
   २. वाणिज्य विभागात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास

७) कै. गंगाबाई शंकर नेने पारितोषिक तर्फे सुनंदा नेने
   १. कला विभागात अर्थशास्त्रात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास.
   २. वाणिज्य विभागात अर्थशास्त्रात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास.

८) श्री. विश्वनाथ श्रीधर गोरे पारितोषिक तर्फे डॉ. थ. वि. गोरे विद्यार्थी/विद्यार्थिनी प्रतिनिधी

९) महाविद्यालयातर्फे उत्कृष्ट शिक्षक व शिक्षकेतर सहकारी.

## ■ प्रवेश रद्द करण्यासंबंधी

अ) प्रवेश घेतल्यापासून १० दिवसांच्या आत प्रवेश रद्द करावयाचा झाल्यास ठरावीक नमुन्यात मा. प्राचार्यांकडे लेखी अर्ज करावा. प्राचार्यांनी प्रवेश रद्द करण्यास अनुमती दिल्यास प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्कापैकी २०% रक्कम कापून घेण्यात येईल, बाकी रक्कम धनादेशाद्वारे परत करण्यात येईल.

आ) प्रवेश घेतल्यापासून ११ ते ३० दिवसांच्या आत प्रवेश रद्द करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस शैक्षणिक शुल्कापैकी ४०% रक्कम कापून बाकी रक्कम धनादेशाद्वारे परत करण्यात येईल.

इ) प्रवेश घेतल्यापासून ३० दिवसांनंतर विद्यार्थी/विद्यार्थिनीचा शैक्षणिक शुल्क परत मागणीबाबतचा अर्ज आल्यास शैक्षणिक शुल्क व इतर शुल्काची रक्कम परत मिळू शकणार नाही.

ई) पालकांचा लेखी अर्ज आल्याशिवाय विद्यार्थ्याचे नाव पटावरून कमी करण्यात येणार नाही.

## ■ अन्य महत्त्वाची माहिती

१) कला व वाणिज्य यातील सर्व वर्गासाठी सेमिस्टर पद्धत आहे. एका वर्षात दोन सेमिस्टरच्या परिक्षा विद्यापीठाकडून घेतल्या जातात.

२) सेमिस्टर पद्धतीमध्ये प्रत्येक सेमिस्टरमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याच्या ३० गुणांची अंतर्गत मूल्यमापन व ७० गुणांची विद्यापीठाची परिक्षा असे प्रत्येक विषयाला दर सेमिस्टरला १०० गुण असतील.

३) या महाविद्यालयाचे नियम, सवलत, अभ्यासक्रम, फी, विद्यापीठ/शासकीय नियमांनुसार आहेत.

४) रविवारी, सुट्टीच्या दिवशी व दिवाळीच्या सुट्टीत आवश्यकता वाटल्यास ट्युटोरियल व जादा तास घेतले जातात.

५) महाविद्यालयात येताना नेहमी ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे. ओळखपत्र जवळ न आढळल्यास त्याला परिसरात व वर्गात प्रवेश दिला जाणार नाही.

६) अंतर्गत मूल्यमापन परीक्षेबाबतच्या सूचना वेळोवेळी सूचना फलकावर लावल्या जातात.

७) सेमिनार/वर्कशॉप डिसेंबरमध्ये घेतले जातील.

८) प्रत्येक सत्राच्या विद्यापीठ परिक्षेचा फॉर्म विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या वेबसाईटवर भरणे आवश्यक आहे.

## ■ ओळखपत्र

या महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर लगेचच ग्रंथालयातून प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र घेणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वत:चे दोन फोटो देणे आवश्यक आहे. लॅमिनेट केलेले ओळखपत्र विद्यार्थ्याने आपल्या गळ्यात अडकवावे. ओळखपत्र असेल तरच महाविद्यालयात वा परिसरात प्रवेश करता येईल. गळ्यात नसलेले वा चौकशी केली असता ओळखपत्र उपलब्ध नसल्यास महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही. महाविद्यालय सोडल्यावर किंवा शैक्षणिक वर्ष संपल्यावर ते ओळखपत्र रद्द समजले जाईल. ओळखपत्र हरविल्यास दुबार ओळखपत्रासाठी तसेच ओळखपत्र मुदतीत न घेतल्यास विलंब शुल्क म्हणून रु. १५० भरावे लागतील.

## ■ ग्रंथालय सभासद

या महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने ग्रंथालयाचे सभासद होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रवेश घेतल्यावर ग्रंथालय प्रमुखांना भेटावे.

महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या तसेच तदनुषंगिक सर्व विषयांची क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, प्रश्नपत्रिकेचे संच, वर्तमानपत्रे, नियतकालिके तसेच अवांतर वाचनासाठीची पुस्तकेही ग्रंथालयात उपलब्ध आहेत. ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येतो. ओळखपत्रावर घेतलेली पुस्तके, मासिके वगैरे ग्रंथालयाबाहेर नेता येणार नाहीत. तथा ग्रंथालयाने घालून दिलेल्या नियमातच पुस्तकांचा व्यवहार करता येईल.

## ■ ग्रंथालय सूचना

१) कामकाजाच्या दिवशी महाविद्यालयाचे ग्रंथालय दुपारी ३.०० ते रात्री १०.०० पर्यंत खुले राहील.

२) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना/विद्यार्थिनींना वाचक पत्र (Borrowers Card) देण्यात येईल.

३) ओळखपत्र जवळ असल्याशिवाय ग्रंथालयात प्रवेश दिला जाणार नाही.

४) ग्रंथालयात शांतता पाळणे गरजेचे आहे.

५) पुस्तके, वर्तमानपत्रे, प्रश्नसंच वगैरे व्यवस्थित हाताळावेत व परत करावेत.

६) विद्यार्थ्याने पुस्तकातील पाने फाडू नये. पुस्तकावर कोणताही मजकूर वा प्रतिक्रिया नोंदवू नये, असे करणे गुन्हा आहे. तसे आढळल्यास त्या विद्यार्थ्याला त्या पुस्तकाची नवीन किंमत भरावी लागेल.

७) विद्यार्थ्याला दिले जाणारे पुस्तक केवळ एका आठवड्यासाठी दिले जाते. नेमून दिलेल्या वेळेत पुस्तक परत जमा न केल्यास प्रत्येक दिवसास दोन रुपये इतका दंड आकारला जाईल.

८) महाविद्यालयाच्या प्रशासकीय सेवेसाठी ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.

९) प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्याने भरलेली ग्रंथालय अनामत रक्कम विद्यार्थी पास झाल्यावर किंवा विद्यार्थ्याने महाविद्यालय सोडल्यावर किंवा पात्रतेची मुदत संपल्यानंतर अनामत रकमेची मूळ पावती सादर करून ते परत करण्यासाठी अर्ज करावा. कोणत्याही परिस्थितीत ६ वर्षानंतर विद्यार्थी अमानत रक्कम परत करण्यासाठी अर्ज करू शकणार नाही.

## ■ अभ्यासक्रमाविषयी सूचना

विषय पेपर्स, क्रमिक पुस्तके, गुण विभागणी, अभ्यासक्रम, उत्तीर्ण होण्यासंबंधीचे नियम, प्रॅक्टिकल्स, ट्युटोरियल्स, सेमिस्टर पद्धती इ. बाबींच्या तपशीलवार माहितीसाठी विद्यापीठाचे अभ्यासक्रम पुस्तक व तत्संबंधीची परिपत्रके विद्यार्थ्यांना ग्रंथालयात किंवा सूचनाफलकावर पाहावयास मिळतील. त्याखेरीज ग्रंथपालांना तसेच संबंधित विषयाच्या प्राध्यापकांना विद्यार्थ्यांनी भेटावे.

## ■ सर्वसाधारण सूचना

१) विद्यार्थ्यांनी वर्गात व महाविद्यालयाच्या आवारात योग्य वर्तणूक ठेवावी.

२) सर्व महत्त्वाच्या सूचना वेळोवेळी काचफलकात लावल्या जातील. यासाठी विद्यार्थ्यांनी रोज महाविद्यालयात आल्यावर जाण्यापूर्वी सूचनाफलक पाहणे आवश्यक आहे. सूचना न पाहिल्याने होणाऱ्या गैरसोयीस, विलंबास, नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

३) स्वत:च्या नावात व पत्त्यात बदल झाल्यास कार्यालयास त्वरित कळवावे.

४) सर्व वाहने महाविद्यालयाने नेमून दिलेल्या वाहनतळावरच व्यवस्थित लावावीत. आपले वाहन हरवल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

५) महाविद्यालयाच्या पत्त्यावर स्थानिक विद्यार्थ्यांनी आपला पत्रव्यवहार मागवू नये.

६) महाविद्यालयाची एकूण मालमत्ता काळजीपूर्वक वापरावी.

७) इमारत स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे. फळ्यावर, बाकावर, भिंतीवर काही लिहू नये. फर्निचर काळजीपूर्वक वापरावे.

## ■ विषयातील बदल

एफ.वाय.बी.ए./एफ.वाय.बी.कॉम.मध्ये एकदा घेतलेले विषय शक्यतो बदलू नयेत. तरीही एखाद्या विद्यार्थ्यास विषय बदलून हवा असल्यास तसा लेखी अर्जासह मा. प्राचार्यांना भेटावे. मा. प्राचार्य संबंधित विषयाचे प्राध्यापक व विभागप्रमुख ह्यांच्याशी चर्चा करून योग्य तो निर्णय देतील. मात्र, ही प्रक्रिया प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसात पूर्ण करावी लागेल. त्यानंतर विषय बदलता येणार नाही.

## ■ सूचना

१) विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी सूचना वेळोवेळी महाविद्यालयाच्या काचफलकावर लावल्या जातात.

२) विद्यार्थ्यांनी कोणत्याही बाबतीत सविस्तर व अद्ययावत माहितीसाठी वेळोवेळी कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगती संदर्भात मा. प्राचार्यांच्या संपर्कात राहावे.

■ **प्रथम वर्ष कला – विषय निवड (एकूण ६ पेपर्स) (सत्र – I व सत्र – II)**

१) आवश्यक इंग्रजी २) आवश्यक मराठी

खालीलपैकी कोणतेही ४ विषय निवडावेत

१) अर्थशास्त्र २) इतिहास ३) राज्यशास्त्र

४) भूगोल ५) मानसशास्त्र

**वर उल्लेख केलेल्या विषयांव्यतिरिक्त सा. फु. पु. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक सत्रामध्ये विद्यार्थ्याला २०१९ सीबीसीएस पद्धतीनुसार आवश्यक ते श्रेयांक (क्रेडीट) मिळवणे आवश्यक आहे.**

■ **द्वितीय वर्ष कला – प्रवेश पात्रता (सत्र – III व सत्र – IV )**

१) बी.ए. द्वितीय वर्षात प्रवेश घेण्यासाठी पुणे विद्यापीठाची प्रथम वर्ष कला परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

२) पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार प्रथम वर्षामध्ये ए.टी.के.टी. असलेले विद्यार्थी द्वितीय वर्षात प्रवेश घेऊ शकतात.

३) इतर विद्यापीठाची प्रथम वर्ष कला परीक्षा उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष कला या वर्गात प्रवेश मिळेल. मात्र, संबंधित विद्यापीठाचा स्थानांतर दाखला सोबत जोडावा. तसेच प्रथम वर्षाला इंग्रजी विषय असणे आवश्यक आहे.

■ **द्वितीय वर्ष कला विषय निवड (सत्र – III व सत्र – IV)**

**द्वितीय वर्ष कलामध्ये स्पेशल विषयाचा अभ्यासक्रम सुरू होतो.**

१) इंग्रजी आवश्यक

**खाली दर्शविलेल्या विषयांपैकी १ स्पेशल विषय घेता येईल.**

गट अ २) मराठी जनरल ३) मराठी स्पेशल–I ४) मराठी स्पेशल–II

किंवा

२) अर्थशास्त्र जनरल ३) अर्थशास्त्र स्पेशल – I ४) अर्थशास्त्र स्पेशल – II

जो विषय स्पेशल (विशेष) स्तरावर घेतला आहे तो सामान्य स्तरावर (जनरल) असणे आवश्यक आहे, मराठी किंवा अर्थशास्त्र

अभ्यासक्रम कार्यभार सायं. ६ ते १० वा. वेळेमध्ये पूर्ण होण्याच्या दृष्टीने विषयांचे गट तयार केले आहेत. त्यापैकी कोणत्याही गटातील एक विषय (जनरल) याप्रमाणे २ विषय निवडावेत.

गट ब ५) राज्यशास्त्र किंवा ५) इतिहास
६) भूगोल किंवा ६) मानसशास्त्र

**वर उल्लेख केलेल्या विषयांव्यतिरिक्त सा. फु. पु. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक सत्रामध्ये विद्यार्थ्याला २०१९ सीबीसीएस पद्धतीनुसार आवश्यक ते श्रेयांक (क्रेडीट) मिळवणे आवश्यक आहे.**

## ■ तृतीय वर्ष कला – प्रवेश पात्रता व विषय

१) प्रथम वर्ष कला परीक्षा उत्तीर्ण.

२) पुणे विद्यापीठ नियमानुसार द्वितीय वर्ष कला या वर्गामध्ये उत्तीर्ण किंवा ए.टी.के.टी. नियमानुसार तृतीय वर्ष कलामध्ये प्रवेश घेता येईल.

३) **द्वितीय वर्षासाठी घेतलेलेच विषय (स्पेशल आणि सामान्यस्तर) तृतीय वर्षासाठी घेणे आवश्यक आहे. तृतीय वर्षात या घेतलेल्या विषयांत बदल करता येत नाही.**

## ■ तृतीय वर्ष कला (सत्र – V व सत्र – VI)

१) इंग्रजी आवश्यक

गट अ २) मराठी जनरल ३) मराठी स्पेशल–**III**, ४) मराठी स्पेशल–**IV**

किंवा

२) अर्थशास्त्र जनरल ३) अर्थशास्त्र स्पेशल–**III** ४) अर्थशास्त्र स्पेशल–**IV**

गट ब ५) राज्यशास्त्र किंवा ५) इतिहास
६) भूगोल किंवा ६) मानसशास्त्र

**वर उल्लेख केलेल्या विषयांव्यतिरिक्त सा. फु. पु. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक सत्रामध्ये विद्यार्थ्याला २०१९ सीबीसीएस पद्धतीनुसार आवश्यक ते श्रेयांक (क्रेडीट) मिळवणे आवश्यक आहे.**

## ● एम. ए. मराठी (सत्र. १)

१) भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्ये भाग – १

२) मराठी साहित्याचा इतिहास (इ.स. १८१८ – १९२०)

३) ऐतिहासिक भाषाविज्ञान ४) ग्रामीण साहित्य

श्रेयांक - १ : मानवी हक्क - I

श्रेयांक - २ : सायबर सुरक्षितता - I

- **(सत्र. २)**

१) भाषा व्यवहार आणि भाषिक कौशल्ये भाग - II

२) मराठी साहित्याचा इतिहास (इ.स. १९२० - २०१०)

३) समाज भाषाविज्ञान ४) दलित साहित्य

श्रेयांक - १ : मानवी हक्क II श्रेयांक - २ : सायबर सुरक्षितता II

- **(सत्र. ३)**

१) प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये भाग - I

२) साहित्यसमीक्षा

३) नेमलेल्या मध्ययुगीन साहित्यकृतीचा अभ्यास भाग - I

४) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

श्रेयांक - १ : सायबर सुरक्षितता III

श्रेयांक - २ : कौशल्य विकसन I

श्रेयांक - ३ : संविधान ओळख

- **(सत्र. ४)**

१) प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये भाग - II २) साहित्य संशोधन

३) नेमलेल्या मध्ययुगीन साहित्यकृतींचा अभ्यास भाग - II

४) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

श्रेयांक - १ : सायबर सुरक्षितता IV

श्रेयांक - २ : कौशल्य विकसन II

- **एम. ए. अर्थशास्त्र - भाग १ (सत्र. १)**

1) Micro Economic Analysis - I 2) Public Economics - I

3) International Trade 4) Rural Economics

Credit 1 : Human Rights - IV Credit 2 : Cyber Security - I

- **Semester - 2**

1) Micro Economic Analysis - II 2) Public Finance - II
3) International Finance 4) Labour Economics
Credit 1 : Human Rights - II Credit 2 : Cyber Security - II

- **M. A. Part II - Semester - 3**

1) Macro Economic Analysis - I 2) Growth and Development - I
3) Research methodology - I 4) Demography
Credit 1 : Cyber Security - III Credit 2 : Skill Development - I
Credit 3 : Introduction to Constritution

- **Semester - 4**

1) Macro Economic Analysis - II 2) Growth and Development - II
3) Research Project 4) Economics of Environment
Credit 1 : Cyber Security IV Credit 2 : Skill Development II

■ **वाणिज्य शाखा अभ्यासक्रम**

■ **प्रथम वर्ष वाणिज्य – सत्र – I व सत्र – II**

१) कम्पलसरी इंग्रजी २) फिनान्शीयल अकौन्टिंग
३) बिझनेस इकॉनॉमिक्स (मायक्रो) ४) बँकिंग अॅण्ड फायनान्स
५) मराठी ६) ग्राहक संरक्षण आणि व्यावसाईक नितीमूल्ये (मराठी माध्यमासाठी) / मार्केटिंग अॅन्ड सेल्समनशिप (इंग्रजी माध्यमासाठी)
७) मॅथेमॅटिक्स अॅन्ड स्टॅटिस्टिक्स किंवा कॉम्प्युटर फंडामेंटस्

**वर उल्लेख केलेल्या विषयांव्यतिरिक्त सा. फु. पु. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक सत्रामध्ये विद्यार्थ्याला २०१९ सीबीसीएस पद्धतीनुसार आवश्यक ते श्रेयांक (क्रेडीट) मिळवणे आवश्यक आहे.**

■ **द्वितीय वर्ष वाणिज्य – प्रवेश पात्रता (सत्र – III व सत्र – IV )**

१) बी.कॉम द्वितीय वर्षात प्रवेश घेण्यासाठी पुणे विद्यापीठाची प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
२) पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार प्रथम वर्षामध्ये ए.टी.के.टी. असलेले विद्यार्थी द्वितीय वर्षात प्रवेश घेऊ शकतात.

३) इतर विद्यापीठाची प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गात प्रवेश मिळेल. मात्र, संबंधित विद्यापीठाचा स्थानांतर दाखला सोबत जोडावा. तसेच प्रथम वर्षाला इंग्रजी विषय असणे आवश्यक आहे.

■ **द्वितीय वर्ष वाणिज्य – (सत्र – III व सत्र – IV)**

१) बिझनेस कम्युनिकेशन २) कॉर्पोरेट अकौंटिंग
३) बिझनेस इकॉनॉमिक्स ४) बिझनेस मॅनेजमेंट
५) एलिमेंट्स ऑफ कंपनी लॉ
६) स्पेशल विषय: बँकिंग अॅण्ड फायनान्स किंवा कॉस्ट अॅण्ड वर्क्स अकौंटन्सी

**वर उल्लेख केलेल्या विषयांव्यतिरिक्त सा. फु. पु. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक सत्रामध्ये विद्यार्थ्याला २०१९ सीबीसीएस पद्धतीनुसार आवश्यक ते श्रेयांक (क्रेडीट) मिळवणे आवश्यक आहे.**

■ **तृतीय वर्ष वाणिज्य – प्रवेश पात्रता**

१) प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण
२) पुणे विद्यापीठ नियमानुसार द्वितीय वर्ष वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण किंवा ए. टी. के. टी. नियमानुसार, तृतीय वर्ष वाणिज्यमध्ये प्रवेश घेता येईल.
३) **द्वितीय वर्षासाठी घेतलेला स्पेशल विषय तृतीय वर्षासाठी घेणे आवश्यक आहे. तृतीय वर्षात या विषयांत बदल करता येत नाही.**

■ **तृतीय वर्ष वाणिज्य (सत्र V व सत्र VI)**

१) बिझनेस रेग्युलेटरी फ्रेम वर्क (एम. लॉ.) २) अॅडव्हान्स अकौंटिंग
३) इंडियन अॅण्ड ग्लोबल इकॉनॉमिक डेव्हलपमेंट
४) ऑडिटिंग अॅन्ड टॅक्सेशन
५-६) द्वितीय वर्षामध्ये स्पेशल म्हणून घेतलेल्या विषयाचे दोन पेपर,

**वर उल्लेख केलेल्या विषयांव्यतिरिक्त प्रत्येक सत्रामध्ये विद्यार्थ्याला २०१९ सीबीसीएस पद्धतीनुसार आवश्यक ते श्रेयांक (क्रेडीट) मिळवणे आवश्यक आहे.**

■ **विविध फॉर्मस् भरण्याचे अंदाजे महिने**

१) पात्रता फॉर्म ऑगस्ट अखेर – प्रवेशप्रक्रियेच्या वेळी
२) फी सवलत फॉर्म ऑगस्ट अखेर – प्रवेशप्रक्रियेच्या वेळी

३) प्रथम वर्ष वैद्यकीय तपासणी-ऑगस्ट/ सप्टेंबर

४) प्रॅक्टिकल बुक वाटप ऑगस्ट

५) विद्यापीठ सत्र परीक्षा परीक्षा फॉर्म - ऑगस्ट / सप्टेंबर तसेच जानेवारी-फेब्रुवारी

## ■ महाविद्यालयातील आणखी उपक्रम

१) कमवा व शिका योजना २) अभ्यासक्रमावरील तज्ज्ञांची विस्तारित व्याख्याने ३) विविध विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन ४) महाविद्यालयात विविध विषयांत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारची पारितोषिके ५) महिला तक्रार निवारण मंच.

## ■ परीक्षा संदर्भात सूचना

१) महाविद्यालयात होणाऱ्या विद्यापीठाच्या सर्व परीक्षांसाठी विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात दिलेल्या मुदतीत परीक्षेचा अर्ज www.unipune.ac.in या वेबसाईटवर भरुन ऑफीसमध्ये जमा करावा.

२) वाणिज्य व कला शाखेतील सर्व वर्गासाठी २०१९ पॅटर्ननुसार ३० गुणांचे अंतर्गत मूल्यांकन सातत्यपूर्ण पद्धतीने करण्यात येते. या अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्याने प्रत्येक सत्रात प्रत्येक विषयात किमान १२ गुण मिळविणे आवश्यक असते.
सत्राच्या शेवटी सावित्रीबाई फुले विद्यापीठातर्फे ७० गुणांची परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान २८ गुणांची आवश्यकता आहे.

३) विद्यापीठाच्या परीक्षेचा फॉर्म Online पद्धतीने भरुन unipune.ac.in या पोर्टरवर जाऊन भरावा व त्याची Print त्वरीत ऑफिसमध्ये जमा करावी, Office मधून परीक्षेच्या फी चे चलन घेऊन फी बँकेत जमा करुन चलन व फॉर्म ऑफीसमध्ये दिलेल्या मुदतीत जमा करावा. त्याशिवाय परीक्षेला बसता येणार नाही व होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

४) परीक्षेच्यावेळी विद्यार्थ्यांच्या जवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र व परीक्षेचे Admit card असणे आवश्यक आहे. परीक्षेच्या वेळेपूर्वी १५ मिनिटे आधी वर्गात उपस्थित रहावे. परीक्षा सुरु झाल्यानंतर येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही.

५) परीक्षेसंदर्भातील सूचना विद्यार्थ्यांसाठी काच फलकात लावण्यात येतात त्याचे वेळोवेळी अवलोकन करावे.

## *About Our College*

*In the year 1920 a group of intellectuals like Shri C. G. Deshpande, V. R. Date, G. N. Tilak, M. K. Bhave, A. M. Palkar and honourable Siddheshwar Shastri Chitrav laid the foundation of the Saraswati Mandir Sanstha in the heart of the Pune city. The institution was set up with the noble intention of taking education to the grassroots.*

*On 15 Sept. 1992 the Sanstha started the Saraswati Mandir Night College of Arts and Commerce to fulfil the educational needs of the disadvantaged and 'working' students. There is a large class of youth who are deprived of higher education as they have to work for their living in the day and so are unable to attend day - colleges. The S. M. Night college has been imparting higher education to such needy students by providing them opportunities of career development.*

*The Principal of the college appointed on regular basis and a team of highly qualified staff are working with great zeal and dedication for the further development of the College. From the year 2004 - 05 the college is introducing the English medium branch of its Commerce wing, a post graduate course in Commerce (M.Com.) and a diploma course in Foreign Languages.*

***MISSION***

***"An institute dedicated to spreading the light of education by night".***

---

## ● *Distinctive Features of the College*

- The college is centrally located at Bajirao Road, Pune.
- It is affiliated to the Savitri bai Phule University of Pune and re-accredited by NAAC. with B Grade (2017-2022)
- It offers excellent opportunities of higher education to the employed and working students.
- A well equipped library and study-room.
- Highly qualified teachers who are sympathetic to the presonal problems of students and keenly interested in their development.
- Workshops and Seminars for quality improvement of students.
- Facilities for computer guidance, competitive exams and placement services.
- Students Welfare Schemes.
- A tradition of good result.
- Alumni Association
- Gatherings and Prise Distributions ceremony.
- Book - Bank
- Participation in Co-curricular and Extra-curricular activities organised by the Savitribai Phule Pune University.
- Student Councelling Cell.
- A Separate Parking for Vehicles.
- College Timings - Office - 3 P.M. To 10 P.M., Classes - 6.00 P.M. To 10.00 PM.

## ● *Admission : B.Com.*

Any student who has passed H. S. C. (Com. / Sci. equivalent) is eligible for admission to F. Y. B.Com. Admission form is available on college website www.smnightcollege.org

A student seeking admission to this college is required to submit his / her application in the prescribed form along with a duly filled in eligibility form. The students admission to the college will be considered tentative until his / her elibibility is recognised by the

---

Savitri bai Phule University of Pune. 75% attendance in the classes for every subject is obligatory for appearing for the final examination.

Students have to submit the following documents (Two photocopies each) along with the application form :

1. Statement of marks for H. S. C. / equivalent examination
2. School leaving certificate
3. Migration Certificate ( If necessary)
4. Gap Cetificate (If necessary)

### *M. A. / M. Com.*

A student who has passed the B. A. / B. Com examination of Pune or any other recognised Universities shall be admitted to the M. A. / M. Com. course. The student is required to submit the following documents along with the application form at the time of admission.

1. Statment of Marks (B. A. / B. Com.)
2. Transfer Certificates
3. Migration and Gap Certificate (if necessery)

### ● *Instructions for students seeking admission to M. A., M. Com.*

1) Submission of application form does not ensure admission to the M. A. / M.Com course.
2) Admission to the M. A. / M.Com. course is subject to rules and regulations prescribed by the Savitri bai Phule University of Pune and the State Govt.
3) Admission will be granted purely on the basis of first come first serve.
4) 75% attendance in classes for each subject is essential for a student to appear for the final examination.
5) The M.A., M.Com. courses will be of two years duration consisting of Two Parts i.e. part I & II. Each part is having Two Semester. Thus the M.A., M.Com. courses are of four semesters. Each semester there will be four papers of 100 mark each. Thus the M.A., M.Com. Degree will be of 1600 marks.
6) The special subject selected in Part I will be continued in Part II.

### ● *Cancellation of Admission*

1. A student desiring to cancel the admission has to submit written application to the Principal within ten days of the admission.

The Principal will grant permission depending on the merit of the applicant. If the cancellation is granted 20% of the admission and tuition fees will be deducted by the college and balance will be refunded by cheque.

2. If the admission is cancelled within 11 to 30 days of the admission, 40% of the admission and tuition fees will be deducted and balance will be refunded by cheque.
3. If the cancellation is sought after 30 days the student will forgo the entire amount.
4. Admission will be concelled only on receipt of a written application by the student's parents

## ● *Important Information*

1. The College library will remain open for students from 3.00 p.m to 10.00 p.m. on every working day.
2. This college follows the rules and regulations, syllabi and fee structure as prescribed by the University.
3. Tutorials and extra classes are to be conducted on Sundays and during the Diwali vacation.
4. Each student has to submit two tutorials and two unit tests of each subject in every term.
5. Every student is obliged to appear for the term end exam.

## ● *Identity - Card*

Every student admitted in the college will have to collect an identity card from the college office / library. He / She will have to submit two photographs without which the identity card willnot be issued. The student will have to pay a fine of Rs. 150/- on losing or failing to obtain the card within stipulated time.

## ● *Library Membership*

Each student taking admission to this college is required to become the member of the college library. He / She can seek the guidance of the Librarian in this matter.

Textbooks, reference books, paper-sets, newspapers, periodicals and other books are available for students in the Library.

- Each student will be given a borrower's card after taking admission in the College.
- No student will be allowed to use the Library without his /her identity card.
- Students will observe silence in the library.

- Students have to handle the books and other reading materials carefully. Any damage to them entails fine.
- The book given to the student is given only for one week.
- A student failing to return the books within the given time will be charged a fine of Rs. 2/- per day.
- A student have to make application for refund of Library Deposit with original Deposit Recepit at the time of passing or at the time of leaving the college or after completion of 6 years of his/her eligibility. After 6 years he/she is not eligible for refund of library deposit.

● ***General Instructions.***

1. Students will observe discipline in the college premises.
2. They should read the notices put up on the notice board regularly.
3. They should communicate any change in their name, address to the college office immediately.
4. They should park their vehicles at the place provided for.
5. They should not use the college address for their presonal correspondence.
6. They should be careful in use of the college property. They should endeavour to keep the classrooms and the premises clean.

● ***Syllabus** - **F. Y. B.Com. (English Medium)*** **(sem-I and sem-II)**

1. Compulsory English 2. Financial Accountancy
3. Business Economics (Micro)
4. Business Mathematics & Statistics or Computer Fundaments
5. Marketing and Salesmanship 6. Banking & Finance
7. Additional Marathi

**In addition to above subject in each semester student has to secure additional credits by two value added courses and completing non-CGPA courses.**

**As Per university norms a student who have passed F.Y.B. Com examination or having A.T.K.T. in F.Y.B.Com is eligible for S.Y.B.Com.**

***S. Y. B. Com.*** **(sem-III and sem-IV)**

1. Business Communication 2. Corporate Accounting
3. Business Economics (Macro)
4. Priciples & Functions of Management
5. Elements of Company Law 6. Cost and Works Accountancy I

**In addition to above subject in each semester student has to secure additional credits by completing value added courses.**

**As Per university norms a student who have passed F.Y.B. Com examination, passing S.Y.B.Com or having A.T.K.T. in S.Y.B.Com is eligible for T.Y.B.Com.**

***T. Y. B. Com***

1. Business Regulatory Frame Work (M. Law) 2. Advanced Accounting
3. Indian & Global Economic & Development 4. Auditing and Taxation
5. Cost and Works Accounting II 6. Cost and Works Accounting III

**In addition to above subject in each semester student has to secure completing non-CGPA courses.**

***M. Com.* Part I - Sem I**

**Compulsory Subject**

1. Management Accounting 2. Strategic Management

**Special Subject**

Advanced Banking & Finance

3. Paper I : Legal Frame work of Banking.

4. Paper II : Central Baking

Credit - 1 : Human Rights - I

Credit - 2 : Introduction to cyber Security - I

**Part I - Sem II**

**Compulsory Subject**

1. Financial Analysis & Control 2. Industrial Economics

**Special Subject**

Advanced Banking & Finance

3. Paper III: Banking Law & Practies 4. Paper IV: Monetary Policy

Credit - 1 : Human Rights Credit - 2 : Introduction to Cyber Security

**Part II - Sem III Compulsory Subject**

1. Business Finance 2. Research Methodology for Business

**Special Subject**

Advanced Banking & Finance

3. Paper V: Foreigen Exchange 4. Paper VI: International Finance.

Credit - 1 : Introduction to Cyber Security Credit - 2 : Skill Development

Credit - 3 : Introduction to constitution

**Sem. IV Compulsory Subject**

1. Capital Market & Financial Services 2. Industrial Economic Environment

**Special Subject**

Advanced Banking & Finance

3. Paper VII: Recent Advances in Banking & Finance
4. Paper VIII: Project Work.

Credit - 1 : Introduction to Cyber Security Credit - 2 : Skill Development

# Career Katta

**(Career and Entrepreneurship Counseling, Skill Development, Internships, Placement, etc.)**

Career Katta is an initiative of Department of Higher and Technical Education, Govt. of Maharashtra and in coordination with Maharashtra Information Technology Support Centre. The college conducts various activities to guide students about Career, Competitive Examinations (UPSC, MPSC, Banking, SSB, SSC, Police, LIC, etc.), Entrepreneurship, Skill Development; Credit Earnings under new CBCS and NEP Curriculum Framework, Internship and Placement Opportunities, etc.

**Eligibility to Join :**

Any student admitted for any regular course in the college or college alumni referred by College Coordinator.

**Registration Fees :** One Time Rs. 365 for Three-year degree period (Rs. 0.36 per day), which will be reimbursed in the form of subsidy on examination charges of CBCS. It including free access to all the activities, courses, State Level Competitive Exams, etc.

**How to Register :** Download the MITSC application from Google Play Store and pay fees using any online payment mode

**College Code :** A 466 (Please include the Career Katta code of the College)

**Contact :** For more details visit college webpage —————— or contact Coordinator Dr. Prashant Mandlik, Department of Chemistry, 94038 66611 or Career Katta Helpline 75076 52555

| | | |
|---|---|---|
| करियर कट्टामध्ये विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी | यूट्यूबवरील उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सबस्क्राईब करा. | करियर कट्टा नियमित उपक्रमाची माहिती मिळवण्यासाठ सबस्क्राईब करा |

## महाविद्यालयीन विकास समिती

| | | |
|---|---|---|
| मा. प्रा. वि. वि. आंबेकर | : | चेअरमन |
| मा. श्री. वि. रा. काकतकर | : | सदस्य, संस्था प्रतिनिधी |
| मा. श्री. अ. प्र. कुलकर्णी | : | सदस्य, संस्था प्रतिनिधी |
| मा. श्री. अ. सु. नाईक | : | चिटणीस, सरस्वती मंदिर संस्था |
| मा. श्री. उदय घोडके | : | सदस्य, प्रसिद्ध उद्योजक प्रतिनिधी |
| मा. श्री. संजीव शाळगावकर | : | सदस्य, माजी विद्यार्थी |
| मा. प्रा. श्याम कांबळे | : | सदस्य, प्राध्यापक प्रतिनिधी |
| मा. डॉ. सविता थोरात | : | सदस्य, प्राध्यापक प्रतिनिधी |
| मा. डॉ. दीपक वेडे | : | सदस्य विभाग प्रमुख |
| मा. डॉ. जया बदी | : | नॅक समन्वयक |
| मा. श्रीमती स्नेहल शेंडे | : | सदस्य, प्राध्यापकेत्तर प्रतिनिधी |
| मा. श्री. विनय बोडस | : | प्रभारी प्राचार्य |

## महत्त्वाची सूचना

(कोणत्याही विद्यार्थ्याने किंवा विद्यार्थी समुहाने रॅगिंग केल्यास त्याच्यावर किंवा त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.)

विद्यार्थ्याने प्रवेश घेतेवेळी रॅगिंग संबंधीचे हमीपत्र भरून महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे. 'रॅगिंग' म्हणजे दुसऱ्याची मानसिक आणि शारीरिक छळवणूक करून आनंद मिळवणे.

रॅगिंगमध्ये खालील कृतींचा समावेश होतो.

१) कनिष्ठ किंवा वरिष्ठ विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्यार्थ्याच्या इच्छेविरुध्द त्याला शारीरिक किंवा मानसिक इजा पोचवणे, त्याची छेड काढणे, त्याला चिडवणे अगर डिवचणे.

२) जुन्या अनुभवी विद्यार्थ्यांनी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अपमानकारक वागवणे. शारीरिक इजा पोचवणे, किंवा अश्लिल लैंगिक चाळे करुन अपमानित करणे. ओंगळवाणे वर्तन करुन नवख्या मुलांना शरमेने ओशाळवाणे करुन त्यांच्यावर मानसिक आघात करणे. त्या मुलांना भयभीत करुन त्यांच्या अभ्यासात व्यत्यय आणणे.

३) नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून जुन्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही कारणाने सक्तीने पैसे उकळणे, त्यांच्याकडून स्वतःची शैक्षणिक कामे करून घेणे, त्यांचे आर्थिक शोषण करणे.

४) नवीन विद्यार्थ्यांना जबरी मारहाण करणे, शिवीगाळ करणे.

५) ई – मेलवरुन धमकावणे अगर अश्लिल संदेश पाठवणे.

६) विद्यार्थ्याचे मानसिक खच्चीकरण करणे आणि विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला खच्ची करणे.

७) महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांनी परस्परांशी कोणत्याही प्रकारचे शारीरिक, मानसिक छळवणुकीचे वर्तन करणे व त्यापासून आनंद मिळवणे.

**▪ रॅगिंग हा गुन्हा आहे. त्या गुन्ह्याला कडक कायदेशीर शिक्षा आहे. ▪**

# सरस्वती मंदिर संस्था

१३५९, शुक्रवार पेठ, बाजीराव मार्ग, पुणे - ४११ ००२.
फोन - ०२०-२४४७५३०९.

## संस्थेच्या विविध शाखा

| | नाव | दूरभाष |
|---|---|---|
| १) | पूना नाईट हायस्कूल व उच्च माध्यमिक | २४४७१६८१ |
| २) | सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस् | २४४३३०१८<br>२४४८६६९३ |
| ३) | चिंतामणी रात्र प्रशाला (चिंचवड) | २५८१७८९३ |
| ४) | पं. दीनदयाळ सेंटर फॉर करीयर डेव्हलपमेंट ॲण्ड रीसर्च | २४४३२५०२ |
| ५) | श्रीमती सुशीलाबाई बहुधनी ज्युनि. कॉलेज ऑफ कॉमर्स, आर्टस् ॲण्ड सायन्स (इंग्रजी माध्यम) | २४४६०४८९ |
| ६) | ज्ञानसंस्कार इंग्लिश स्कूल | २४४६०९९२ |

## विद्यापीठ गीत

।। ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञाना।।

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान
जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठातुनि हाच एक सूर
करूणेच्या चरणांशी नत हो विज्ञान
माणुसकी धर्माचा अर्थ जाणतो

श्रमनिष्ठा है पवित्र तीर्थ मानतो
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान
सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्वपरीक्षा
हे विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान...

मंगेशपाडगावकर